# एक

## बाबा पद्मनजी : जीवनक्रम आणि व्यक्तिमत्वाची जडणघडण

एक

## बाबा पदमनजी : जीवनक्रम आणि व्यक्तिमत्वाची जडणघडण

### उत्तर पेशवाईतील अंदाधुंदी

उत्तर पेशवाई म्हणजे राज्यप्रशासनाची अधोगती, राज्यकर्त्यांचा अतिरेकी विलासीपणा, त्यांनी प्रजेकडे केलेले दुर्लक्ष, धार्मिक कर्मकांडाचे घृणास्पद प्राबल्य,

व्यक्तिगत आणि सार्वत्रिक स्वरूपातील नैतिक स्खलन या सर्वांचे प्रतीक होते. इंग्रजांची तैनाती फौज स्वीकारल्यामुळे दुसरा बाजीराव परावलंबी आणि निमाल्यवत् झाला होता. इंग्रजी फौजेकडून मिळालेल्या सुरक्षा स्वास्थ्यामुळे त्याचा मूळचा रंगेलपणा उफाळून आला होता. त्याच्या भोवती ऐदी आणि खुशामस्क-यांचे कडे निर्माण झाले होते. बाजीरावाने एकूण अकरा लग्ने केली व त्याप्रीत्यर्थ हजारो रुपये उधळले. स्त्रियांकडे पाहाण्याची त्याची दृष्टी भोगलोलुपच नव्हे, तर विकृत होती. जे सरदार आपल्या बायका वाड्यात पाठविण्यास खळखळ करीत त्यांच्यावर बाजीरावाची नामर्जी होई. प्रत्यक्ष पेशव्याचेच चारित्र्य अशा-प्रकारे भ्रष्ट असल्याने त्याचे दुष्परिणाम प्रजेला अनेक परींनी भोवले. जपजाप्य, देवपूजा, उपासतापास, तीर्थयात्रा आणि अनेक प्रकारचे रंगढंग यामध्ये बाजीरावाचा वेळ, पैसा खर्च होई. बाजीराव हा अतिशय मत्सरी, विकृत, संशयी होता असे सर मॅकिंटॉश व एल्फिन्स्टन यांनी नोंदवून ठेविले आहे.[१] अशा या राज्यकर्त्यामुळे राज्यात अंदाधुंदीला, बेबंदशाला उधाण आले.

ज्याच्या हाती सत्ता त्यालाच न्याय मिळे. सरकारी कराच्या ओझ्याखाली शेतकरी आणि शहरवासी सारखेच भरडून निघत. सैन्यातील शिपायांचे पगारही थकलेले असत. त्यामुळे बाजीरावाची राजवट संपून इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर सर्वांनीच सुटकेचा नि:श्वास टाकला. बाजीरावाच्या पदच्युतीची द्वाही फिरल्या-नंतर अवघ्या छत्तीस तासांत त्याच्या सैनिकांनी इंग्रजांची चाकरी करण्याचे कबूल केले,

ही घटना या संबंधात मुद्दाम उल्लेखण्याजोगी आहे. पेशव्यांनी प्रजेच्या शिक्षणाच्या उत्तेजन, प्रोत्साहन वा विकास याबाबतीत तसेच कलावंतांना आश्रय देऊन कला-कौशल्याची वाढ करण्याच्याबाबतीत काहीही केले नाही. त्यांच्या राज्यात प्रतिवर्षी श्रावणमासात दक्षिणा वाटण्याची चाल होती, इतरही दानधर्म विपुल होत असे. हे सारे खरे असले तरी ज्ञानाच्या उपासनेपोटी, ग्रंथांच्या निर्मितिसाठी, लोकांच्या शिक्षणासाठी या अफाट रकमेपैकी अल्पांशाचा देखिल विनियोग होत नसे.

इ.स. १८०३-४ च्या दरम्यान पुणे प्रांती भयानक दुष्काळ पडला होता. त्यावेळी मुंबईच्या इंग्रजांनी, पारशांनी, गुजरात्यांनी बाजीरावाच्या राज्यातील प्रजेला सढळ हाताने मदत करावी आणि खुद्द बाजीरावाने मात्र फक्त ब्राम्हणांना सहाय्य करावे [२] हा प्रकार विस्मयजनक व खेदकारक होता. त्याच्या राज्यात ब्राम्हण आणि ब्राम्हणेतरांना विषम वागणूक मिळत असे. ब्राम्हणाने खुनाचा अपराध केला तर तो केवळ प्रायश्चित्ताने शुध्द होई. पण इतरांना याच गुन्ह्याबद्दल मृत्युदंडाची शिक्षा मिळत असे. राज्यकर्त्यांच्या न्यायीपणाबद्दलचा प्रजेच्या मनातील विश्वास खच्ची करणारे हे सारे वातावरण होते.

<u>एलफिन्स्टन : एक उत्कृष्ट प्रशासक</u>

प्रजेच्या हिताची व स्वास्थ्याची कोणत्याही प्रकारे कदर न करणारा अधिपती असणे ही गोष्ट परकीयांच्या आक्रमणाला अतिशय अनुकूल असते. महाराष्ट्रातही हेच घडले. इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचे उच्चाटन होऊन इंग्रजी अंमल चालू झाला. इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीलाच एलफिन्स्टन सारखा चतुर, मुत्सद्दी व दूरदर्शी प्रशासक असल्यामुळे महाराष्ट्रातील इंग्रजी राजवटीची पहिली घडी व्यवस्थित बसली. वित्ताच्या व जीविताच्या सुरक्षिततेची प्रजेला मिळालेली हमी, जुलूम जबरदस्तीमधून झालेली सुटका, अन्यायाविरुध्द दाद मागण्याची मिळालेली संधी, न्याय मिळण्याची खात्री, धर्मविषयक स्वातंत्र्य, शिक्षणविषयक सोयी सवलती इ. गोष्टी प्राप्त झाल्यामुळे सामान्य प्रजा संतुष्ट झाली.

समाजातील ब्राम्हणाचे वर्चस्व ध्यानी घेऊन त्यांना संतुष्ट ठेवण्यासाठी व पेशवाईच्या अस्तानंतर त्यांची दुखावलेली मने इंग्रजी राजवटीला अनुकूल करून घेण्यासाठी एलफिन्स्टन याने कांही पथ्ये पाळली. त्याने पुण्यात जो दक्षिणेचा समारंभ घडवून आणला त्यामागे लोकमत इंग्रजी राजवटीला अनुकूल करून घेण्याचा उद्देश होता. धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याची ग्वाही त्याने दिली होती. परंतु आंधळा लोकानुनय हेच त्याच्या प्रशासकीय धोरणाचे मुख्य सूत्र नव्हते. प्रजेचे अज्ञान दूर व्हावे, तिचा सर्वांगीण विकास व्हावा अशीही त्याची तळमळ होती.

एलफिन्स्टनची शिक्षणविषयक भूमिका

परंपरागत रूढींच्या आहारी गेलेल्या आणि अनेक अमानुष, घातुक चालीरितीनी कुजलेल्या एतद्देशीय समाजाला सुसंस्कृत करण्यासाठी शिक्षण हेच प्रभावी साधन आहे हे एलफिन्स्टनने ओळखले. विशेषत: हिंदूंवर धर्माचा विलक्षण पगडा असल्याने त्यांच्या धर्मविषयक श्रध्दांना धक्का न लावता त्या श्रध्दांचे शुध्दीकरण केले पाहिजे हे त्याने ओळखले. त्यासाठी त्याने शिक्षण विषयक धोरण निश्चित करून त्याच्या कार्यवाहीसही आरंभ केला.

शिक्षणाबद्दलचे एलफिन्स्टनचे विचार पुरोगामी व उदारमतवादी होते. सरकारने जनतेच्या शिक्षणाच्याबाबतीत पैशाची काटकसर करणे हे सर्वस्वी अयोग्य आहे असे त्याला वाटे. प्रत्येक गरीब देशामधील प्रजेचे सुख बव्हंशी सुशिक्षित-पणावर अवलंबून असते. विचारीपणा आणि स्वाभिमान या दोन गुणांपासून इतर सा-या चांगल्या गुणांची उत्पत्ती होत असते, आणि हे दोन गुण प्राप्त करण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. बालविवाहाचे दुष्परिणाम, वाढत्या लोकसंख्येपासून उद्भवणारी संकटे, विवाहासारख्या समारंभात सा-या आयुष्याची कमाई उधळून टाकण्याचा अव्यवहारीपणा इ. सा-या हीन गोष्टी निपटून काढण्यासाठी शिक्षण हाच तोडगा आहे, असा एलफिन्स्टनचा विश्वास होता.

शिक्षण प्रसाराचे साधन ख्रिस्ती मिशन-यांच्या हाती देण्यास मात्र त्याचा विरोध होता. शिक्षणात धर्मप्रसाराचा हेतू जर मिसळला तर प्रजेच्या धार्मिक बाबतीत ढवळाढवळ न करण्याच्या सरकारी धोरणाबद्दल जनतेत अविश्वास निर्माण होईल असे त्याला वाटत होते. म्हणूनच सरकारी शाळांमधून ख्रिस्ती धर्माचे शिक्षण देणे जरूर आहे. या सूचनेला त्याने कडाडून विरोध केला आणि ख्रिस्ती मिशन-यांचा रोष ओढवून घेतला.

ख्रिस्ती मिशन-याचे आक्रमण व त्याचे परिणाम
-----------------------------------------

स्वदेशातून पैसा आणून ख्रिस्ती मिशन-यांनी एतद्देशीय प्रजेला शिक्षण देण्याच्या नावाखाली प्रसंगी सरकारी आदेश धुडकावून धर्मप्रसार करण्याचे अनेक प्रयत्न चालविले होते. इंग्रज आपल्यापेक्षा सर्वच बाबतीत श्रेष्ठ आहेत आणि आपण फार मागासलेले आहोत असा न्यूनगंड त्यांच्या शिक्षणपध्दतीमधील धर्म-संस्कारांच्या प्रभावामुळे एतद्देशीय नवशिक्षितांच्या पहिल्या पिढीत निर्माण झाला. या मानसिक दुबळेपणाचा फायदा ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी घेतला. हिंदू धर्म आणि हिंदू समाज यांतील वैगुण्यांवर त्यांनी एकतर्फी झोड उठविली. अपरिपक्व विचाराच्या अनेक तरूणांवर या विपर्यस्त टीकेचा अनिष्ट परिणाम झाला. ब-याच जणांनी उघड धर्मांतर केले नाही, तरी त्यांची स्वधर्माबद्दलची श्रध्दा मात्र उडाली. ख्रिस्ती धर्मोपदेशकाचे धर्म प्रसाराचे कार्य अतिशय पध्दतशीर आणि परिणामकारक होते यात शंकाच नव्हती. त्यात जुलूम जबरदस्तीला फारच थोडा वाव होता. `तुका म्हणे पाणी, पातळपणे तळा खणी` या न्यायाने ख्रिस्तानुयायांचे हे धार्मिक व सांस्कृतिक आक्रमण मुसलमान राज्यकर्त्यांच्या आक्रमणापेक्षाही अधिक परिणामकारक होते.

विचारमंथनाच्या या काळात स्वधर्मातील वैगुण्यांचा विचार करताना त्यात सुधारणा घडवून आणण्याची प्रेरणा एतद्देशीयांना मिळणे जसे शक्य होते त्याचप्रमाणे वाईटाने डागाळलेल्या या धर्माचा त्यागच का करू नये, असा

संभ्रम निर्माण होणेही असंभाव्य नव्हते. याला विशेष कारण हेच की, आपले धर्मविचार व आचार फारच अवनत स्थितीत होते. उच्च नैतिक मूल्ये व मानवतेच्या संकल्पनांना पायदळी तुडविले जात होते. कोरड्या कर्मकांडाचे स्तोम माजले होते. त्यामुळे या सर्व गोष्टींना विटलेले, नवे ते चांगले आणि त्याचे अनुकरणच योग्य असे म्हणू लागले.

वाट शोधण्याचे प्रयत्न

या काळातील सर्वच नवशिक्षित अंधानुकरणाला बळी पडले नाहीत. स्वसंस्कृतीचा अभिमान धरूनही इंग्रजांचे गुण उचलणे शक्य आहे याची जाणीव काहींना झाली. बाळशास्त्री जांभेकर (१८१२-१८४६) हे अशांपैकी अग्रगण्य होत. ख्रिस्ती झालेल्या श्रीपत शेषाद्रीस त्यांनी पुन्हा हिंदू धर्मात घेतले. यामध्ये त्यांचा स्वधर्माबद्दलचा अभिमान जाणवतो, तसेच त्यांची सुधारणाक्षमता प्रत्ययास येते. परंतु त्यांची सर्व मेहनत समाजात प्रत्यही दिसणारी खुळे निपटून काढण्यात खर्च झाली. त्या खुळांचे कारण शोधून काढणे त्यांना साधले नाही. शिवाय त्यांचे सारे प्रयत्न शिक्षित वर्गापुरतेच मर्यादित होते.

लोकहितवादींना (१८२३ -१८९२) मात्र आधुनिक युगाची चाहूल लागली होती. प्रपंच आणि परमार्थ ही क्षेत्रे वस्तुत: भिन्न आहेत. धर्म म्हणजे केवळ कायदाच आहे आणि तो बदलण्याचा अधिकार समाजातील विचारवंतांना आहे हे त्यांनी ओळखले व सातत्याने मांडले. 'हिंदुसमाजसंस्था ज्या धर्मग्रंथांवर उभारली त्या धर्मग्रंथांचे प्रणेते दिव्यदृष्टीचे लोक होते' किंवा 'वेद अपौरुषेय अथवा ईश्वरोक्त आहेत' या श्रध्दांवर प्रहार करण्याकरिता त्यांनी समाजनेता व धर्मनेता असलेला ब्राम्हणवर्ग आणि त्याच्या विद्या कशा अपुऱ्या आहेत, सद्य:कालीन समाज प्रगतीला कशा विरोधी आहेत हे दाखवून दिले. जोतीराव फुले (१८२७-१८९०) यांनीही ब्राम्हणवर्गावर व त्यांच्या भ्रष्ट आचरणावर टीका करून ब्राम्हणेतरांच्या मनातील न्यूनगंड कमी करण्याचा, शुध्द नीति आणि मानवता

यांना प्राधान्य देऊन नवी धर्मकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला. त्याकाळी समाजात शास्त्री पंडितांचे जबरदस्त वजन होते. आधुनिक सुशिक्षितांचे नेतृत्व पुढे आले नव्हते. त्यामुळे या दोघांचेही विचार प्रतिपादन केवळ अरण्यरुदन ठरले.

तीन मतप्रवाह

नव्या संस्कृतीच्या परिचयामुळे हाती लागलेल्या मूल्यनिकषांच्या आधारे आमच्या धर्मसंस्थेचे समीक्षण करण्याचे प्रयत्न होऊ लागले. यात प्रामुख्याने तीन मतप्रवाह होते. एक प्रवाह म्हणजे जगातील सर्व धर्मांचा गाभा एकच आहे, मानव-समाजातील धार्मिक भेद भ्रममूलक आहेत असे मानणाऱ्यांचा होता. मूळ नैतिक तत्त्वांशी विरोधी असणारे आचार व कायदे ईश्वराच्या विरोधी आहेत म्हणून ते वर्ज्य केले पाहिजेत अशी मते बंगालमध्ये राजा राममोहन रॉय यांनी मांडली. महाराष्ट्रात `परमहंस सभे`ने त्यांचेच अनुकरण करून मूर्तिपूजेचा त्याग आणि शुध्द ईश्वरभक्ती आरंभिली. धर्माच्या बाबतीत कोणीही ढवळाढवळ करू नये अशी भावना रूढ असताना, धर्मस्वरूपात बदल करण्याची तयारी `परमहंस सभे`ने दाखविल्यामुळे तिचे प्रयत्न प्रगतिपर ठरतात.

याच काळात हिंदू धर्माचा जाज्वल्य अभिमान बाळगणारी व आक्रमक पवित्रा घेऊन ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक अतिक्रमणाला तोंड देणारी एक विचारप्रणाली अस्तित्वात होती. या विचारप्रणालीच्या लोकांनी स्वबांधवांची अंधश्रध्देत गुरफटलेली व अगतिकतेत सापडलेली धर्मबुध्दी मुक्त केली. मोरभट दांडेकर यांनी इ.स. १८४३ मध्ये `उपदेशचंद्रिका` हे मासिक काढून त्याद्वारे ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या मिथ्या आरोपांचे निरसन चालविले. विष्णुबुवा ब्रम्हचारी (१८२५-१८७१) यांनीही आपल्या धर्मग्रंथातील अनेक प्रमाणे देऊन मिशनऱ्यांच्या आरोपातील फोलपणा सिध्द केला. शेकडो लोकांसमक्ष ख्रिस्ती मिशनऱ्यांशी वादविवाद करून त्यांच्या उथळ व ठराविक कोटिक्रमांचे सयुक्तिक खंडन केले. विष्णुबुवांनी स्वकीयांचे वेळोवेळी समर्थन केले तरी स्वंग लोकप्रियतेच्या नादी लागून त्यांच्या मूर्खपणाला, दांभिकतेला प्रोत्साहन दिले नाही.

विष्णुबुवांनी ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या सोडसाळ विधानांचा यथास्थित समाचार घेतला, तथापि त्यांनी घेतलेल्या न्याय आक्षेपांतील कटू सत्याकडे दुर्लक्षही केले नाही.

स्वधर्माच्या आचारातील दांभिकता व भ्रष्टपणा यामुळे त्याविषयी पूर्ण अश्रध्द झालेला आणि ख्रिस्ती मिशन-यांच्या प्रभावामुळे धर्मांतर करणा-यांचा एक वर्गही याकाळात अस्तित्वात होता.

अंतर्मुखता

ख्रिस्ती मिशन-यांनी हिंदू धर्मावर केलेल्या टीकेमुळे स्वधर्माविषयी पुनर्विचार करावा असे अनेकांना वाटू लागले. हिंदू धर्मातील उदात्त तत्वज्ञानावर कर्मठपणाचा आणि अंधश्रध्देचा जाड थर पसरलेला होता. त्यामुळे या उदात्त तत्वाचे प्रतिबिंब तत्वज्ञ धर्मगुरूंच्या वर्तनातही दिसून येत नसे. रंजल्या-गांजलेल्यांच्या अंगावरून मायेचा हात फिरविण्यास किंवा त्यांच्या डोळ्यातील आसवे पुसण्यास हे ब्रम्हवेत्ते क्वचितच धावून येत. आमच्या विद्वानांची धर्मबुध्दी कर्मकांडाने व धर्मडखोरीने झाकलेली होती तर खेडयातील लोकांची धर्मबुध्दी भ्रामक समजुती व दुष्ट रूढींनी दडपली गेली होती. मात्र सातासमुद्रापलीकडून आलेले इंग्रज, धर्मप्रसाराच्या छुप्या हेतुतून का होईना पण रोकडी जनसेवा करीत हे दृष्य परिणामकारक होते.[३]

ख्रिस्ती मिशन-यांची शिकवण आणि त्यांचा सहवास यामुळे अनेकजण ख्रिस्ती धर्माकडे आकर्षिले गेले. त्यांच्या मानसिक अवस्थेचे चित्रण दा.न.शिखरे यांनी केले आहे.[४] `समता या ख्रिस्ती धर्मातील तत्वाने हिंदी विद्वानांवर मोठीच मोहिनी घातली. ईश्वर हा पिता व मानव हा बंधू ( Fatherhood of God and Brotherhood of Man ) या दोन सिध्दांतांची येथील विचारवंतांवर छाप पडली ------- स्वत: येशू ख्रिस्त हा दया-क्षमा-शांतीचा पुतळा. त्याचे सारे जीवन त्यागाने घुतलेले व त्याचे `गिरि-प्रवचन` अहिंसा, अपरिग्रह, अस्तेय अशा दैवी संपदेने भरलेले. त्यामुळे `मानवधर्माचा हा काही नवाच साक्षात्कार आहे`

अशा दृष्टीने इंग्रजी शिकलेले हिंदी लोक ख्रिस्ताकडे पाहू लागले.'

या मानसिक द्वंद्वाच्या कालखंडात नव्या जुन्याचे मूल्यमापन वेगवेगळ्या निकषांवर सुरू झाले.

बाबा पदमनजी : बाळपण आणि संस्कार
---------------------------------

या काळातील कर्त्या पुरुषांपैकी एक म्हणून बाबा पदमनजी ओळखले जातात. धार्मिक प्रबोधन आणि त्यासाठी लेखन ही त्यांची जीवननिष्ठा होती. मराठी गद्यशैलीला वळण लावणारा, विविधस्वरूपी लेखन करणारा म्हणून बाबांची थोरवी मोठी आहे. तरीही त्यांच्या साहित्य सेवेबद्दल आणि जीवन-चरित्राबद्दल अजून गाढ अज्ञानच आढळते. बाबा धर्मांतरित ख्रिस्ती असल्यामुळे हे उपेक्षेचे दान त्यांच्या पदरी पडले असावे.

बाबांचे पूर्ण नाव बाबा पदमनजी मुळे असे असले तरी त्या काळातील नामोल्लेखाच्या प्रघाताप्रमाणे ते बाबा पदमनजी म्हणूनच ओळखले जातात. त्यांचा जन्म इ.स. १८३१ च्या मे महिन्यात बेळगाव येथे झाला. त्यांची निश्चित जन्म तारीख शोधण्याच्या के.सी.क-हाडकरांच्या प्रयत्नांना यश आले नाही.[५] बाबा कासार जातीचे होते. व्यापाराच्या निमित्ताने त्यांचे पूर्वज गुजरातेत सुरत येथे राहिले होते त्यामुळे त्यांच्या घरातील अनेक रिवाजांवर पारशी-गुजराती संस्कारांची छाप होती. बाबांच्या वडिलांचे नाव पदमनजी माणिकजी असे होते. त्यांचे शिक्षण टी.ब्री. जर्विस यांच्या इंजिनिअरिंग स्कुलात झाले होते. प्रथमत: ते कोंकणात सब् असिस्टंट सर्वेअर आणि बिल्डर होते. पुढे त्यांची बदली बेळगावास झाली. बाबांनी तेथील मारुती आळीतील घराबद्दल ब-याच आठवणी सांगितल्या आहेत. बाबांच्या वडिलांनी त्या जुन्या पध्दतीच्या घरास मोठ्या खिडक्या पाडून घेतल्या होत्या. ओटीवर बाके, खुर्च्या ठेविल्या होत्या. पुढे अंगणात बाग करून, रात्री दारापुढे मुंबईच्या रितीप्रमाणे कंदील टांगण्याची व्यवस्था केली होती. त्या जुन्या घरास त्यांनी

एखाद्या आधुनिक बंगल्याचे रूप दिले होते.

आसपास ब्राम्हणांची वस्ती असल्यामुळे बाबांच्या मांसाहारी घराला फारच जपून आणि मिळून वागावे लागे. एवढा मांसाहार वगळता बाबांच्या घरचे वातावरण अतिशय कर्मठ, ब्राम्हणी संस्कृतीला जवळचे होते. दानधर्म, व्रतवैकल्ये, सोवळे ओवळे आचरिण्यात बाबांच्या घरचे लोक कोणत्याही ब्राम्हणा-पेक्षा कमी नव्हते. बाबांची आई पुष्कळ व्रते, उपवास श्रध्देने करीत असे. बाबांचे वडील फारसे कर्मठ नसले तरी त्यांची भगवद्‌गीतेवर मोठी श्रध्दा होती.

स्नान केल्यानंतर सोवळ्याची वस्त्रे नेसून जेवण्याची पध्दत होती. अस्पृश्याचा स्पर्श झाल्यास सचैल स्नान करावे लागे. बाबांच्या बालपणी त्यांच्यावर झालेल्या धार्मिक संस्कारांची माहिती समजण्यास वरील उल्लेखांचे सहाय्य होते.

बाबांचे प्राथमिक शिक्षण बेळगावच्या सरकारी मराठी शाळेत पूर्ण झाले. तेथे त्यांना भूगोल, व्याकरण, गणित या विषयांची प्राथमिक ओळख झाली. तेथील एक शिक्षक बाबांच्या वडिलांच्या ओळखीचे असल्यामुळे बाबांना लवकरच वरच्या वर्गात घालण्यात आले. याचे दुष्परिणामही झाले. बाबांचे गणित कच्चे राहिले व अक्षरही वळले नाही. बाबांच्या वडिलांच्या जागरूकतेमुळे त्यांना शिक्षणविषयक अनेक सोयी उपलब्ध झाल्या. बाबांना कानडी शिकविण्यासाठी एक जंगम पंतोजी घरी येत असे. प्राकृत ग्रंथ शिकविण्यासाठी एका पंडिताची योजना केली होती. त्याने बाबांना रूपावली, समासचक्र आदि शिकविले.

बाबा, मिशनच्या शाळेत
---------------------

चुलत्यांच्या ओळखीने बाबांनी मिशन स्कूलमध्ये प्रवेश घेतला. भवानसिंघ, आपाजीराव, तात्या खरे हे हिंदू शिक्षक तेथे होते. तसेच रे. टेलर व रे. केनन हे

मिशनरीही अध्यापन करीत. बाबा या शाळेत शिकत असले तरी स्वधर्मावर त्यांची नितांत श्रध्दा होती. एके दिवशी एक ख्रिस्ती ट्रॅक्ट त्यांच्या वाचनात आले असता त्यातील हिंदु देवतांविषयींच्या अनुचित उल्लेखांवरून राग येऊन त्यांनी ते ट्रॅक्ट फाडून त्याच्या चिंध्या चिंध्या केल्या.[६]

सरकारी नोकर असलेल्या एका वैष्णव ब्राम्हणाची देवीभक्ती व त्याची लाचखाऊ वृत्ती, शंकराचार्यांच्या आगमनाचेवेळी करण्यात येणारी कोटी लिंगे व त्यातील भ्रष्टाचार यांमधील विसंगती हेरण्याइतकी त्यांची विवेकबुध्दी मिशन स्कूल मधील धर्मविषयक संस्कारांमुळे जागृत झाली होती. बाबांनी याकाळात मंत्र शिकण्याचे जे प्रयत्न केले त्यांत केवळ पाठांतर होते हे त्यांना तेव्हाच पुसटसे का होईना जाणवले होते. बाबांची ही मन:स्थिती थोडी विचित्र आहे. हिंदु धर्माचरणाच्या धर्मंडीत वावरत असताना, त्यातील काही तत्वाबद्दलचा संशय त्यांच्या मनात घर करू लागला होता. आपल्या जातीला `वेदोक्तफलप्राप्त्यर्थम्` असे उच्चारण्याचा अधिकार का नाही, हा प्रश्न त्यांना पडत असे. बाबांसारख्या भाविक तरूणापुढे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी हिंदु धर्मातील वैगुण्ये दर्शविली. त्यामुळे ही वैगुण्ये ज्यात नाहीत अशा ख्रिस्ती धर्माकडे त्यांनी झुकावे हे स्वाभाविक होते. दोषापूर्ण, मानवताविरोधी आणि विसंगतींनी बुजबुजलेल्या हिंदु धर्माचा त्यागच का करू नये, अशा विचारापर्यन्त बाबा हळू हळू येऊ लागले.

<u>`धर्म` या शक्तीने मनाचा कब्जा घेतला</u>

इ.स. १८३९ मध्ये बाबा त्यांचा चुलता व आतेच्या लग्नासाठी मुंबईस गेले. प्रयाणापूर्वी जोशाला बोलावून चांगला मुहूर्त पाहिला जातो, प्रस्थान काढले जाते. तरीही मार्गात अनेक संकटे येतात. गाडीचा आस मोडतो, धाकट्या भावाला देवी येऊन त्याचे डोळे जातात, जवळचा पैसा संपल्यामुळे दागिने मोडून लग्ने उरकावी लागतात. या सर्वच अनुभवांकडे चिकित्सावृत्तीने पाहाणारे बाबा शकून, मुहूर्त यांविषयी साशंक झाले.

इ.स. १८४७ मध्ये ते पुन्हा सागरी मार्गाने मुंबईला गेले. या खेपी त्यांनी तेथे बराचकाळ वास्तव्य केले. प्रख्यात नाटककार महादेवशास्त्री कोल्हटकर यांच्या सल्ल्याने ते एलफिन्स्टन स्कूलमध्ये जाऊ लागले. बाबाजी अमृत हे त्यांचे वर्गशिक्षक होते. ते मोठे प्रेमळ, शांत आणि विद्यार्थीप्रिय अध्यापक होते. त्यांच्या एकंदर व्यक्तिमत्वाचा बाबांच्या मनावर मोठाच परिणाम झाला.

या शाळेत शिकत असताना हिंदू धर्मविषयक अनेक पुस्तके बाबांनी वाचून काढली. काही विकत घेऊन त्याचा संग्रह केला. वयाच्या संस्कारक्षम अवस्थेत, धर्म ही एकमेव शक्ती त्यांच्या मनाचा कब्जा घेत होती. त्यांची धर्मविषयक चिकित्सा-वृत्ती जागी होणे हा ख्रिस्ती धर्मस्वीकारा आधीचा टप्पा होता. यासाठीच हिंदू धर्माचे तत्वज्ञान, आचार, अधिकारी पुरुष व त्यांची शिकवण या साऱ्यांचे ज्ञान करून घेण्याचा ते आटोकाट प्रयत्न करीत होते.

बाबांच्या जीवनक्रमात बदल घडविणारी एक घटना या दरम्यान घडली. ती म्हणजे लग्न. लग्नाचे वेळी बाबांचे वय सतरा वर्षांचे तर त्यांच्या पत्नीचे वय दहा वर्षांचे होते. तत्कालीन रिवाजानुसार लग्न मोठ्या डामडौलात झाले. लग्नातील कलावंतिणींच्या नाचाबद्दलचा खर्च अनाठायी होता हे तेंव्हादेखिल त्यांना जाणवलेले होते. कारण खरा धर्म व खरी नीति कोणती, याविषयी त्यांच्या विचारांची चक्रे गतिमान होत होती.

एडनची सफर

बाबांच्या वडिलांची बदली एडनला झाली होती. बाबांच्या लग्नानंतर परत जाताना ते बाबांसह सर्वांना एडनला घेऊन गेले. या स्थलांतरामुळे बाबांच्या शिक्षणावर मात्र संक्रांत आली. त्यांच्या वडिलांनी त्यांना इंजिनिअरच्या ऑफिसात माहे तीस रुपये पगारावर रायटरची नोकरी लावली. त्यांचे मन नोकरीत रमले नाही. त्यांचे लक्ष इतर बाबतीतच अधिक असे. तेथील बांधकाम खात्यातील

कामगाराचे मद्यपानाचे अतिरेकी व्यसन व त्यापायी होणारी शरीराची नासाडी यांवर त्यांनी गंभीर विचार केला. या लोकांसाठी आपण मद्यपानवर्ज्यक सभा स्थापू शकलो नाही याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला आहे. दरम्यान बाबांच्या अंगी बेळगावच्या सविसाचे वारे येऊ लागल्याने त्याच्या शांतीसाठी त्यांना हिंदुस्थानात परत पाठविले जाते.

नवे वळण
--------

हिंदुस्थानात आल्यानंतर परत एडनला जाण्याचा बाबांचा बेत होता. परंतु मिलिटरी बोर्डास अर्ज करूनही प्रवासाचा पास न मिळाल्याने त्यांचे जाणे रद्द झाले. विद्याभ्यासासाठी त्यांनी डॉ. विल्सन यांच्या फ्रीचर्च विद्यालयात प्रवेश घेतला. एडनला जाणे रद्द होणे व फ्रीचर्च विद्यालयात प्रवेश घेणे या घटनांबद्दल ` हे ईश्वरी सूत्रांकडून झाले यात संशय नाही. ` अशी बाबांची प्रतिक्रिया आहे. याच शाळेच्या संस्कारामुळे ते खऱ्या धर्माचा शोध घेत ख्रिस्ती धर्माचा अंगिकार करते झाले.

या शाळेतील एक शिक्षक, रे.नारायण शेषाद्री हे स्वभावाने शांत, प्रेमळ व गरीब मुलांविषयी आस्था बाळगणारे होते. ते बाटलेले ब्राम्हण असल्याने त्यांच्या हाताखाली शिक्षण घेणे बाबांना रुचले नाही. परंतु पुढे निकटच्या सहवासामुळे बाबांचे त्यांच्याबद्दलचे सर्व गैरसमज दूर झाले. काही सहाध्यायांच्या संगतीने बाबांना लागलेले तपकिरीचे व्यसन रे.शेषाद्रींच्या उपदेशामुळे सुटले. ही घटना म्हणजे फ्रीचर्च विद्यालयात जी सुधारणूक होत गेली, तिचे आरंभस्थान आहे असे बाबांना वाटले.

या वेळेपर्यन्तचे बाबांचे धर्मज्ञान केवळ पौराणिक हिंदू धर्माचे होते. वेद व वेदप्रणित विचार यापासून ते दूर होते. त्या विचारांपर्यन्त त्यांना नेण्याचे प्रयत्नही कोणी केले नाहीत. हिंदू धर्माचरणाच्या कोशात वावरत असताना

त्यांना पापाचे भय कधी जाणवले नाही. आपण दुराचारी झाल्याने देव कोपेल असेही वाटले नाही. अनीतिने चालावे असा उपदेश कोणी केला नसला तरी अनीतिने वागणे हा अधर्म आहे हे कोणी सांगितले नाही.

याच काळात म्हणजे इ.स. १८५० मध्ये भारतीय कायदे मंडळाने धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा मंजूर केला. धर्मांतरामुळे एखाद्या व्यक्तीचे कोणतेही पूर्वहक्क बुडत नाहीत असे या कायद्यान्वे जाहीर झाले. तसेच धर्मप्रसारालाही स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे अनेक विद्वान जाहीर सभा घेऊन आपआपल्या धर्ममताचे समर्थन करू लागले. याचाही परिणाम बाबांच्या मनावर होत होता.

## सत्य, नीतीची ओढ

बुध्दिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सर्व मानवांची राष्ट्रभेदनिरपेक्ष, वंशभेदनिरपेक्ष नैसर्गिक समता ही तीन मूलतत्वे पाश्चात्य विद्येने इकडे रुजविली. त्यामुळे ऐहिक कसोटीवर मानवी जीवनाचा विचार सुरू झाला. केवळ पारलौकिकच नव्हे तर ऐहिक हिताहिताचा संबंध देखिल व्यापक, शुध्द नैतिक तत्वांशी जोडला जाऊ लागला. धर्मग्रंथांतील रूढ परंपरेवर आधारलेले आचार-विचार म्हणजे खरा धर्म नव्हे, अशी बाबांचीही धारणा होत चालली. म्हणूनच आत्मोन्नतीची तळमळ प्रकट करणारी एक शपथ ७ त्यांनी घेतली. उपरोक्त धर्मविषयक विचार-मंथनाचा व्यक्तिगत पातळीवरील अपरिहार्य परिपाक म्हणजे ही शपथ होती. फ्रीचर्च विद्यालयात जाऊ लागल्यापासून व ख्रिस्ती शास्त्रातील शुध्द नीति शिकू लागल्यावरून असा निश्चय अगत्यपूर्वक करावा असे बाबांना वाटले.

## शाळा - गुरूंचा प्रभाव

रे.शेषाद्री शिकवित असलेल्या वर्गात बाबा बसू लागले होते. त्यांच्या घरी चालणाऱ्या खाजगी वर्गालाही ते जात होते. फ्रीचर्च विद्यालयात गणित व रसायनशास्त्र हे विषय वगळता प्रत्येक तासाला धर्मचर्चा चालेच. डॉ.विल्सन,

डॉ. मरे मिचेल यांच्यासारख्या कुशल अध्यापकांच्या शिकवणीमुळे बाबांना ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेची प्रमाणे दिसू लागली. वरच्या वर्गात चर्चचा व सुधारणुकीचा इतिहास रे.शेषाद्री फारच उत्कटतेने व तन्मयतेने शिकवित. त्यातील ल्यूथरच्या असामान्य धैर्याचा परिणाम बाबा व त्यांच्या वर्गमित्रांच्या संस्कारक्षम मनांवर झाला.

१७ फेब्रुवारी १८५१ मध्ये बाबांनी `ज्ञानप्रकाश` मध्ये ' लिहिलेल्या पत्रात असे आवाहन केले होते की, `पूज्य विद्वानांनी आपल्या आत्म्याचे तारण करण्याकरिता कोणते मार्ग शोधून काढले असतील तर त्यांनी ते जगप्रसिध्द करावेत.` बाबा कोणत्या गोष्टीचा शोध घेत होते, हे यावरून ध्यानी येते. या ख्रिस्त प्रेमामुळेच ख्रिस्ती नसतानाही बाबा बायबल मास्तर झाले.

## वाचनाचा हव्यास

बाबांच्या परिवर्तनक्षम मनावर परिणाम करणारी आणखी एक गोष्ट म्हणजे त्यांचा वाचनाचा हव्यास होय. सामान्यपणे कादंबरी वाचनाची ओढ तारूण्यात माणसाला असते पण बाबांना ती नव्हती. फिरत्या ग्रंथविक्रेत्याकडून बाबांनी काही पुस्तके ' विकत घेतली, ज्यांनी त्यांची मनोधारणा घडविली.

नियतकालिके व त्यात चालणाऱ्या वैचारिक चर्चांनीही बाबांच्या मनाची घडण केली. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी चालविलेल्या `ज्ञानोदया` शी त्यांचा घनिष्ठ संबंध आला होता. हे पत्र ते श्रध्दापूर्वक वाचीत व त्यात लिहित. धर्मांतराच्या निर्णयापर्यन्त न पोहोचलेल्या त्यांच्या मनाला एक दिशा देण्याचे काम `ज्ञानोदया`ने केले. `ज्ञानोदय`कारांना लिहिलेल्या एका पत्रात [१०] बाबा म्हणतात, `हा विषय लिहिणारा ज्याकाळी सत्यशोधक होता त्याला ह्या पत्रापासून जे सहाय व उत्तेजन मिळाले त्याचा त्याला कधी विसर पडणार नाही.` `ज्ञानप्रकाश`चेही ते काहीकाळ एजंट होते. `प्रभाकरा`तून प्रसिध्द

होणाऱ्या लोकहितवादींच्या लेखमालेमुळे ब्राम्हणांविषयीच्या त्यांच्या पारंपारिक श्रध्दावृत्तीत फरक झाला. या साऱ्या वृत्तपत्रांचा त्यांच्या मनावर नेमका कसा परिणाम झाला याचे वर्णन[११] बाबांनी केले आहे, `ह्या तिन्ही पत्रांकडून माझी तीन प्रकारची सुधारणूक झाली, म्हणजे ज्ञानोदयाने माझी ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेविषयी व हिंदुधर्म ईश्वरपुणित नाही याविषयी खातरी केली. प्रभाकराने माझ्या मनात ब्राम्हणांविषयी जी पूज्यबुध्दी होती ती नष्ट केली आणि ज्ञानप्रकाशाने नास्तिक मताकडे माझी प्रवृत्ती होऊ दिली नाही.`

हिंदुधर्म ईश्वरप्रणित नसल्याची खात्री झाल्यामुळेच हिंदू धर्माभिमान्यानी चालविलेली पत्रे त्यांना निंद्य वाटतात. कृष्णाशास्त्री चिपळूणकर यांच्या `विचारलहरी` या पत्राबद्दल त्यांनी `निंदक व बाष्कळ पत्र` असे म्हटले आहे.

ठाकुरद्वारातील धर्मसंवाद

धर्मविषयक जाणीव संस्कारित करण्यासाठी, धर्मपर पुस्तके, नियतकालिके वाचणे यासोबतच व्याख्याने ऐकणे हा एक मार्ग बाबांनी वापरलेला होता. वे.शा.सं. कृष्णाशास्त्री साठे यांनी एक धर्मविषयक व्याख्यानमाला ठाकुरद्वारात सुरू केली होती. तिची जाहीरात १९ सप्टेंबर १८५२ च्या `प्रभाकरा`त प्रसिध्द झाली होती. बाबा या व्याख्यानांना हजर राहिले होते. त्यांचा सारांश व त्यावरील स्वत:चे भाष्य `ज्ञानोदया`कडे लिहून पाठवित. बाबांची अशी सुमारे २५ पत्रे, त्यांच्या इंग्रजी भाषांतरासह `ज्ञानोदयात` प्रसिध्द झाली होती. बाबांच्या धर्मविषयक निष्ठा कशा आकार घेत होत्या याचे स्वच्छ दर्शन या पत्रांचा कानोसा घेतल्यास घडते.

पाद्री लोक `बैबला`द्वारे लोकांना फसवितात असा आरोप कृष्णाशास्त्री यांनी केला. त्याचे खंडन करताना बाबा म्हणतात,[१२] `शास्त्री यांनी पाद्री लोकांवर ठकबाजीचा मिथ्या आरोप आणिला आहे व ते लोक आपल्या शास्त्रातील असली वाक्ये दुसऱ्यास सांगत नाहीत म्हणून ते मतळबी आहेत असे म्हणाले. यास उत्तर,ख्रिस्ती धर्म लोकाने समजू नये व बैबल वाचून न

पाहाता पाद्री जे सांगतील त्यावरच विश्वास ठेवावा असे असते तर आज १८० भाषांमध्ये ते शास्त्र छापून प्रसिध्द झाले नसते, व लोकांस ते वाचण्याची जशी मोकळीक आहे तशी न मिळती.' बाबाचे हे विवेचन खोटे आहे असे कृष्णशास्त्र्यांना म्हणता आले नाही.

होळीच्या सणामध्ये हिंदू जे अवाच्य बोलतात त्याचे कृष्णशास्त्री यांनी समर्थन केले.[१३] ' होळीजवळ बसून गुह्य शब्द बोलावे, बोंब मारावी अशी शास्त्राज्ञा आहे व त्यावेळी त्यात पाप नाही असे सांगितले आहे. उलट तसे केल्याने द्रव्यसंपत्ती प्राप्त होती. आता पाषांडी लोक जे आपले शास्त्र मानत नाहीत त्यास आम्ही विचारितो की ते दोन शब्द उच्चारले असता काय दोष आहे ? जसे हात, पाय इ. शरीराचे इतर अवयव आहेत तसेच ते आहेत. त्यांच्या नांवातच पाप आहे तर ते आपणापाशी का बाळगता, कापून का टाकत नाही ? ' शास्त्र्यांचे हे म्हणणे बाबांनी पुढीलप्रमाणे खोडून काढले.[१४] ' आता शास्त्रीबाबांनी गुह्य शब्द बोलण्यात दोष नाही असे उपपादन केले त्याप्रमाणे एखादा मनुष्य खून करण्याविषयी बोलू लागेल ते असे. जर शस्त्रवैद्य सुरीने माणसाच्या शरीराच्या एका भागातून म्हणजे हात पाय यातून रक्त काढतात तर दुसऱ्या एकाने त्याच्या मानेतून काढले म्हणून काय दोष आहे ? '

या पत्रांमधून ख्रिस्ती धर्माच्या दिशेने होत चाललेल्या बाबांच्या मनोप्रवासाचा कितीतरी तपशील उपलब्ध होतो.

बाबांची मनोघडण आणि ' निबंधमाला '

काही निबंध लिहून ते ग्रंथरूपाने प्रसिध्द करण्याची महत्वाकांक्षा बाबांनी याच काळात बाळगलेली होती. वेगवेगळ्या संस्थांकडून ठेवलेल्या बक्षिसांकरिता या उमेदवारीच्या काळात बाबा लिहित होते. या उद्योगात पैशाच्या लोभापेक्षा त्यांची हौस, जिद्द, तळमळ जाणवते. दक्षिणा प्राईज कमिटीला सादर केलेल्या ' सर्वसंग्रही ' उर्फ ' निबंधमाले ' तील विषयांची विविधता त्यांच्या सर्वस्पर्शी

जिज्ञासेचे दर्शन घडविते.

या पुस्तकातील काही लेखांमधून त्यांनी नाना धर्मांचा विचार केला असला तरी त्यांच्या मनावरील ख्रिस्ती धर्ममतांचा पगडा जाणवण्याइतका सुस्पष्ट आहे. ' स्वदेशप्रीति ' या निबंधातून ते जुन्या व नव्या राजवटींची तुलना करीत आहेत व इंग्रजी राज्यापासून काय घेण्यासारखे आहे, हे सांगत आहेत, पौर्णिमेची रात्र, चहा, ग्रहणे, सृष्टीतील गुह्य गोष्टी इ. विषयांवर बाबा लेखणी चालवित असले तरी ते त्यांचे आवडीचे विषय नव्हेत. त्यांचे धर्मजिज्ञासु मन या विषयात गुंतणेच शक्य नव्हते.

बाबांचे वाचन चौफेर होते. नियतकालिकेही ते बारकाईने वाचीत. त्यामुळे वृत्तपत्रांतील ताज्या घडामोडींवरही त्यांनी लेखणी चालविली आहे. सर्व विषयांवर विचारप्रतिपादन करण्याची बाबांची जिद्द, ' शहाणे करून सोडावे सकळ जन ' ही त्यांची आकांक्षा यामधून जाणवते. बाबा या काळात जे वाचीत होते, मित्रांशी जी चर्चा करीत होते, त्यामधून त्यांचे काही दृष्टीकोन आकारत होते. या सर्वांमधून त्यांच्या मनाची, ख्रिस्ती धर्माच्या रोखाने जी एक घडण होत होती त्याचे प्रतिबिंब ' निबंधमाले ' त पडले आहे.

## गुप्तपणे जातिभेद मोडला

अमेरिकन मिशन भजनाल्यातील धर्मपर व्याख्यानांना बाबा नेमाने जात होते. डॉ. विल्सन यांच्या आंब्रोली मिशनगृहातील व्याख्यानमालेचाही त्यांनी लाभ घेतला. बाबांच्या मित्रमंडळीत मूर्तिपूजा, जातिभेद यांविषयी वाद होत आणि ख्रिस्ती धर्म, बायबल यांविषयी एकमत होई. हे सर्वजण धर्मविषयक पुनर्विचार करू लागले होते.

त्याकाळात ' सुधारलेला ' या शब्दाला गैरसमजाचे आणि कुचेष्टेचे वलय होते. त्यामुळे बाबा स्वत:ला कधीही सुधारलेला असे म्हणवून घेत नसत.

सुधारणानुकूल मित्रमेळ्यात वावरणारे बाबा जातिभेदाविषयी मोठ्या आवेशाने चर्चा करीत. बाबांचे मित्र ज्यावेळी त्यांना पावबिस्कुटे खाण्यास सांगत त्यावेळी त्यांची फार पंचाईत होई. कारण जातिभेद मोडण्याबद्दल त्यांच्या मनाची अजूनही पूर्ण तयारी झाली नव्हती. बिस्कुटे खाल्ली तर सर्वजण ` बाट्या ` म्हणतील, कुटुंबातील सर्वांपासून आपणास दूर राहावे लागेल, अशी त्यांना भिती वाटे. एके दिवशी मात्र या संबंधात त्यांच्या मनाचा निश्चय झाला आणि शाळा सुटल्यानंतर हिंदू मित्रमंडळीत त्यांनी गुप्तपणे जातिभेद मोडला.

बाबा आणि ` परमहंस मंडळी `

रा.ब.दादोबा पांडुरंग व त्यांच्या समविचारी मित्रांनी हिंदू धर्मातील अनिष्ट गोष्टी टाळून एकेश्वर मत स्थापण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या उपासना पंथास ` परमहंस मंडळी ` हे नाव दिले. आपल्या मित्रांच्या संगतीने बाबा या संस्थेचे सदस्य झाले. मंडळीच्या सदस्यांची संख्या पुरेशी वाढेपर्यन्त सदस्यांची नावे गुप्त ठेवावीत असे ठरले होते पण एका सदस्याने ही नावे वृत्तपत्रातून प्रसिध्द केली. हे सर्वजण लवकरच ख्रिस्ती होणार आहेत असा सर्वत्र गवगवा झाला. त्यामुळे सदस्यांच्या नातेवाईकांना काळजी लागून राहिली. अनेकांना मुंबई बाहेर धाडण्यात आले. यावेळी बाबांचे वडील साता-याजवळ उडता-यास होते. आईच्या आजारपणाचा खोटा निरोप पाठवून बाबांना तेथे बोलावून घेण्यात आले. बाबा ख्रिस्ती होणार अशी सर्वांना धास्ती पडली होती. पण खरे म्हणजे उघड ख्रिस्ती व्हावे असे बाबांना अजूनही वाटत नव्हते. मूर्तिपूजेवरील त्यांची श्रध्दा मात्र पूर्ण उडाली होती. वडिलांच्या ह्यातीत ख्रिस्ती होणार नाही अशी शपथ घेतल्यानंतरच त्यांना मुंबईस जाण्याची परवानगी मिळाली. बाबांनी मातापित्यास जे वचन दिले होते ते अयोग्य असल्याचे त्यांच्या मित्रमंडळींना वाटले, बाबांनाही पटले व वडिलांना पत्र लिहून त्यांनी शपथेतून आपली मुक्तता करून घेतली. परमहंसमंडळीच्या बैठकींना ते परत जाऊ लागले.परंतु बहुसंख्य सदस्यांनी धर्मविषयक नास्तिक विचारसरणी

स्वीकारल्यामुळे बाबा या संस्थेमधून बाहेर पडले.

## संभ्रमातून निर्णयाकडे वाटचाल

बाबांचा हिंदू धर्मावरील विश्वास उत्तरोत्तर उडत चालला असला तरी वेद हे ईश्वरप्रणित आहेत अशी त्यांची श्रध्दा होती. डॉ. विल्सन यांनी केलेले ऋग्वेदाच्या प्रथम अष्टकाचे भाषांतर जेव्हा त्यांच्या वाचनात आले तेव्हा अग्नी, सूर्य, इंद्र यांची वेदात वर्णिलेली भक्ती म्हणजे एक प्रकारची मूर्तिपूजाच आहे असे त्यांना जाणवले. त्यामुळे ` आश्रयार्थ हिंदु धर्माचा जो शेवटचा खांब मी धरिला होता तो मोडून पडला ` असे बाबा म्हणतात. या त्यांच्या उद्गारातून वेदांविषयी त्यांचा भ्रमनिरास झाल्याचे जाणवते.

केवळ ऐहिक प्रयत्नांतर्गत प्रगतीमुळे मनुष्य तरत नाही, तर त्यासाठी अंतर्यामी पश्चाताप व प्रभू येशूवरील विश्वास आवश्यक आहे असे त्यांना वाटू लागले. शाळा गुरूंची धर्मविषयक शिकवण, ख्रिस्ती भजनालयातील उपदेश श्रवण, यामुळे आत्म्याच्या चिरकालिक आनंदासाठी ख्रिस्ती धर्मच योग्य आहे असे त्यांना वाटू लागले.

आपल्या मुलाचे परधर्माकडील आकर्षण फ्रीचर्च विद्यालयातील वातावरणामुळेच वाढू लागले आहे हे त्यांच्या वडिलांच्या ध्यानी आल्यामुळे वैद्यक शिकण्यासाठी बाबांना ग्रँट मेडिकल कॉलेजात धाडण्याचे त्यांनी ठरविले. या अभ्यासक्रमात त्यांचे मन रमेना म्हणून अध्यात्मशास्त्राची ओढ लागलेल्या बाबांनी वैद्यशास्त्राची रजा घेतली. यानंतर पुन्हा ते फ्रीचर्च विद्यालयात जाऊ लागले. कुटुंबियांबद्दलच्या प्रेमामुळेच आपणाकडून धर्मांतराच्या निर्णयाची निश्चिती होत नाही याची कबुली त्यांनी आपल्या एका ख्रिस्ती मित्राला पाठविलेल्या पत्रात [१५] दिली आहे.

याच काळात म्हणजे साधारणत: इ.स.१८५१ पासून ते इ.स.१८५४ च्या मध्यापर्यन्त बाबांची पांच पुस्तके [१६] प्रसिध्द झाली.

## निर्णयाची निश्चिती

इ.स. १८५४ च्या प्रारंभी बाबांच्या वडिलांची बदली बेळगावास झाली. मुंबईच्या ख्रिस्ताळलेल्या वातावरणापासून आपल्या मुलाला दूर बेळगावास न्यावे म्हणजे त्याच्या मनातील धर्मांतरविषयक विचार कमी होतील असे त्यांना वाटले. इ.स. १८५४ च्या एप्रिल महिन्यात बाबा आपल्या मातापित्याच्या समागमे बेळगावास आले. प्रवासात असताना मनाविरूध्द काही धार्मिक विधी आचरण्याचा प्रसंग त्यांचेवर आला. त्याप्रसंगी ल्यूथरच्या धैर्याची त्यांनी आठवण केली आणि स्वत:स खोटे दिसते ते वर्ज्यण्याचा निश्चय केला. घरातील लोकांना ख्रिस्ती धर्माचा परिचय करून देण्याच्या बोलीने बाबा बेळगावास आले होते पण त्यासाठी सर्वच नाराज होते. घरात बरेच वादविवाद झाले आणि सर्वांचेच मानसिक स्वास्थ्य हरपले. या मानसिक वादळातही बाबा आपले इप्सित साध्य करण्यासाठी अहोरात्र तळमळत होते. शेवटी ख्रिस्ती धर्मस्विकाराचा निर्णय घेतला तेव्हाच त्यांच्या मनाला समाधान वाटले.

बाबांनी आपला निर्णय रे.टेलर यांना कळविला व त्यांच्या घरी आश्रय मागितला. रविवार ता.१३ ऑगस्ट १८५४ या दिवशी बाबा त्यांच्या घरी मुक्कामास गेले. दुसरे दिवशी आई त्यांना परत नेण्याकरिता आली पण बाबा स्थिर राहिले. त्यांचे वडील फिरतीवरून परत आले. ते या प्रसंगात खूपच समजुतदारपणे वागले. अखेर बाबांचा बाप्तिस्मा ३ सप्टेंबर १८५४ या दिवशी सायंप्रार्थनेनंतर लंडन मिशनच्या इंग्लिश देवळात झाला.

## धर्मांतरानंतरची वादळे

बाबांच्या मनातील संघर्ष आता संपलेला होता परंतु त्यांना इतर अनेक वादळांना तोंड द्यावे लागले. `तू प्रकाशात गेलास पण आमच्या घरात अंधार पडला` घरच्या निरोपाचा हा अपरिहार्य कडू घोटही त्यांनी गिळला.

`ज्ञानप्रकाश`, `वर्तमानदीपिका` या नियतकालिकांना बाबांचे धर्मांतर अविवेकीपणाचे व मनाच्या अपक्वतेचे द्योतक वाटले.[१७] `ज्ञानोदया`ने त्यांच्या धर्मांतराचे समर्थन करावे हे सहाजिकच होते.

ख्रिस्ती धर्मस्वीकारानंतर बाबा मुंबईस आले. फ्रीचर्च विद्यालयात शिक्षकाचे काम करीत असताना ते ईश्वरी विद्या शिकू लागले. पत्नीला स्वगृही आणण्याचा प्रयत्न अपयशी झाल्यानंतर इ.स. १८६० मध्ये एका ख्रिश्चन स्त्रीशी त्यांनी विवाह केला.

ख्रिस्ती धर्ममताचे चिंतन
------------------

धर्ममतांची चर्चा, व्याख्याने, लेखन, नियतकालिकांचे संपादन हा त्यांचा व्याप होता. ज्या ज्या ख्रिस्ती धर्मसूत्रांचा त्यांना अनुभव आला, तद्विषयक त्यांनी जे चिंतन केले त्यात त्यांच्या धर्मप्रवण मनाचे प्रतिबिंब पडले आहे.[१८] बायबल विषयी त्यांची उत्कट श्रध्दा आहे. `बायबल हे माझ्या पायास दीप व वाटेस प्रकाश आहे`, असे बाबा म्हणतात. पुन: पुन्हा वाचनामुळे त्याची नवी ओळख त्यांना होत गेली. `ते समुद्राप्रमाणे खोल व ओहळाप्रमाणे उथळही आहे. त्यात महाबुध्दीरूप गलबते चालतात व त्यातून मुंगीसारखा अल्पमती पोहून जातो` हा त्यांचा अनुभव आहे.

जुन्या करारातील पुष्कळ भक्त धनिक असूनही त्यांची भक्ती परमार्थाकडे होती यासंबंधी त्यांनी वाचले होते म्हणूनच बाबा मोह टाळण्यास शिकले. ईश्वराची भक्ती हेच त्यांच्या जिण्याचे सूत्र बनले. सर्वसमर्थ आणि सर्वज्ञानी ईश्वराकडून व त्याच्या सूत्रांकडून जगच्चालन होते असे त्यांच्या अनुभवास आले. `मी ख्रिस्ती झाल्यापासून ईश्वरी सूत्रांचे विशेष अवलोकन करावयास शिकलो. त्याकडून जगात जी महत्कर्मे होतात त्यापासून काही प्रकारे मला बोध होऊ लागला. त्यात विशेषेकरून ख्रिस्ती धर्माच्या प्रसारार्थ ईश्वर आपल्या सूत्राने कोणकोणत्या गोष्टी घडवून आणतो हे मला समजू लागले ------ मनुष्याच्या

मनात अनेक कल्पना असतात परंतु जो परमेश्वराचा संकेत, तोच ठरेल हे सत्यही मी अनुभवले. ` हे धर्मविषायक चिंतन हीच बाबांची जीवन जगण्याची प्रेरणा होती.

मानसन्मानांचा लाभ

७ एप्रिल १८६७ या दिवशी बाबांची पुणे येथील फ्रीचर्च मिशनच्या पाळकपदी दीक्षा झाली. त्यांनी हे काम फार दिवस केले नाही. इ.स.१८७३ मध्ये त्यांनी या कामाचा राजिनामा दिला व देवाने आपल्या हाती केवळ लेखणीच दिली आहे हे ओळखून तिचा अप्रतिहत उपयोग केला. बाबांची शे-सव्वाशे पुस्तके, त्यांच्या लेखनविषायक दीर्घोद्योगाची साक्ष देण्यास पुरेशी आहेत.

बाबा आपल्या पत्रव्यवहाराबाबत अतिशय काटेकोर असत. समाजातील विविध स्तरांतील लोकांशी ते पत्रद्वारा संपर्क साधत. पुढील अवतरणावरून त्यांच्या पत्रव्यवहारामागील प्रेरणेचे स्वरूप अधिक स्पष्ट होते. ` गेल्या चाळीस वर्षांत मी सरासरी बारा हजार पत्रे लिहिली असतील. त्यात शेकडो पत्रांच्या प्रति आज माझ्यापाशी नाहीत तरी त्यांस आलेली बहुतेक उत्तरे माझ्या संग्रही आहेत व ती पुतळ्या व मोहरा त्यांच्यापेक्षा मला मौल्यवान वाटतात. त्यातून कित्येकात जो अनुभवरस भरला आहे तो अमृतापेक्षा गोड आहे. ` बाबांचा पत्रव्यवहार हा प्रामुख्याने आध्यात्मिक विचारविनिमयासाठी झालेला आहे.

इ.स.१८७७ मध्ये त्यांनी बायबल व ट्रॅक्ट् सोसायटीच्या संपादकाचे काम पत्करिले. बायबलच्या मराठी आवृत्तीची मुद्रिते तपासणे, विषायानुक्रमाने मथळे दिलेले बायबल तयार करणे ही कामे त्यांनी मोठ्या तन्मयतेने केली. त्यामुळे कोणतीही शिफारस केली नसताना ` ब्रिटिश ॲण्ड फॉरेन बायबल सोसायटीने बाबांना आपल्या संस्थेचे ` ऑनररी फॉरेन मेंबर ` करून घेऊन त्यांचा गौरव केला.

आपल्या बाप्तिस्म्याच्या तेहेतिसाव्या वर्षी म्हणजे इ.स.१८८७ मध्ये

त्यांनी आपले आत्मचरित्र ` अरूणोदय ` लिहावयास घेतले. देवाने अंगिकार करून त्यांजवर जी परमदया केली त्याची फेड करण्याकरिता त्यांनी हा लेखन प्रपंच केला.[१९]

९ सप्टेंबर १८९४ मध्ये ` अनुभवसंग्रह ` भाग-१ हे आध्यात्मिक अनुभूती सांगणारे त्यांचे पुस्तक प्रसिध्द झाले. त्यात त्यांच्या ख्रिस्ती जिण्यातील अनुभवांचा परिपाक आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेतून त्यांनी ` बाबांना आता धर्मांतराचा पश्चाताप झाला असेल ` या आरोपाला चोख उत्तर देऊन ख्रिस्ती धर्मावरील आपली श्रध्दा पूर्वीहितकीच अढळ आहे. याचे दर्शन घडविले आहे.[२०]

बाबांनी बायबल व ट्रॅक्ट सोसायटीच्या संपादकाचे काम सातत्याने पंचवीस वर्षे केले. बाबांच्या सारखा दीर्घव्यासंगी लेखक व संपादक लाभल्यामुळे सोसायटीचे अनेक ग्रंथ निर्माण झाले. ट्रॅक्ट सोसायटीचा अर्धाअधिक ग्रंथसंग्रह बाबांच्या हातचा होता.[२१] इ.स. १९०२ मध्ये सोसायटीकडून केलेल्या कामाची पावती-म्हणून बाबांना पेन्शन मंजूर करण्यात आले.

९ सप्टेंबर १९०४ या दिवशी बाबांच्या बाप्तिस्म्याच्या ज्युबिलीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी त्यांच्या ` अनुभवसंग्रह ` भाग-२ या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या समारंभाप्रीत्यर्थ इंडियन ख्रिश्चन असोसिएशनतर्फे एक सभा आयोजित करण्यात आली होती. यानिमित्ताने बाबांच्या आयुष्यभरच्या तपश्चर्येचा गौरव करण्यात आला. यावेळी त्यांना मानपत्र देण्यात आले. त्यातील त्यांच्या साहित्यसेवेबद्दलचे उद्गार [२२] मार्मिक आहेत, ` आपण जे लहानमोठे ग्रंथ लिहिले आहेत त्यांची संख्या शंभरावर गेली आहे. त्या ग्रंथांच्या योगाने शेकडो लोकांस ख्रिस्ती धर्माचे ज्ञान प्राप्त झाले आहे. व ज्यास आपले मार्गदर्शन कधीही घडले नाही ते देखील आपणास आपल्या ग्रंथांवरून ओळखतात. `

जीवनयात्रेची समाप्ती
---------------

सर्वच बाजूनी कृतकृत्य झालेले बाबा वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी

दि. २९ ऑगस्ट १९०६ रोजी प्रभुपदी विलीन झाले. हा ख्रिस्ती मराठी सारस्वताचा जनक एकेचाळीसाव्या गीताच्या पहिल्या वाक्याचे संशोधन करीत असता ख्रिस्तवासी झाला.

बाबांच्या मृत्यूनंतर `ज्ञानोदया`त प्रसिध्द झालेला अग्रलेख त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू स्पष्ट करणारा आहे. `या प्रिय पित्याच्या सहवासास मुकलो `या शब्दात `ज्ञानोदया`ने दु:ख प्रकट केले आहे.[२३]

एकोणिसाव्या शतकातील साहित्याच्या प्रेरणा, प्रवृत्ती, स्वरूप यांची मूलभूत चिकित्सा करणाऱ्यांनी बाबा पदमनजींच्या साहित्यसेवेमागील त्यांच्या व्यक्तिमत्वाचे स्वरूप व त्याची जडणघडण यांचे भान ठेवणे आवश्यक आहे.

समारोप

इंग्रजी शिक्षणपध्दतीमुळे परंपरागत भारतीय संस्कृतीच्या जीवनमूल्यांची समीक्षा करणारी नवी सुशिक्षितांची पिढी निर्माण झाली होती. त्यांच्यामुळे अंधश्रध्देत गुरफटलेली एतद्देशीयांची विवेकबुध्दी मुक्त झाली. केवळ कर्णगोचर असे परंपरागत आध्यात्मिक तत्वज्ञान आणि दृष्टीगोचर असे ऐहिक युग यांच्यातील अंतर नव्या शिक्षणामुळे स्पष्ट झाले. धार्मिक आणि सामाजिक या दोन कल्पनांत भेद दाखविणारी सीमारेषा यामुळे सापडली.[२४]

समग्र जीवन धर्मप्रेरणेनेच भारून टाकले होते अशा काळात धर्मसुधारणा म्हणजेच समाजसुधारणा असे मानले गेले. परंतु धर्मसंस्था ही एक सामाजिक संस्था आहे. तिचा उत्कर्ष होतो तशी अवनतीही होते, हे आमच्या ध्यानी आले नव्हते. या अवनतीची कारणे शोधून स्वधर्मोध्दार करू इच्छिणाऱ्यांप्रमाणेच हिंदू धर्मातील विसंगतींना विटलेले व ख्रिस्ती धर्मामुळे भारलेले अनेकजण होते. बाबा पदमनजी हे यापैकी एक होते. त्यांनी अनेक वर्षांच्या धर्मचिंतनानंतर

धर्मांतराचा निर्णय घेतला होता.

बाबांच्या धर्मांतराची मीमांसा करताना त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीकडे लक्षपूर्वक पहावे लागेल. बाबा मुळात अंतर्मुख होतेच, विद्याभ्यासामुळे बहुश्रुत झाले. बाबा स्वधर्माबद्दल सश्रध्द होते परंतु ज्यावेळी वेद हे ईश्वरप्रणित नाहीत, हिंदू धर्मात पापविमोचनाचे सामर्थ्य नाही, त्यामधील मूर्तिपूजा अतार्किक आहे. याविषयी त्यांच्या मनाची खात्री झाली त्यावेळी त्यांनी स्वधर्माचा त्याग केला. बाबांच्या धर्मांतरामागे ख्रिस्ती शाळांतील वातावरण व ख्रिस्ती मिशन-यांच्या सहवासाचा प्रभाव, ही कारणे नव्हती असे नाही परंतु केवळ एवढयानेच त्यांचे धर्मपरिवर्तन घडले नाही.[२५]

धर्मांतराचा निर्णय घेताना त्यांना हृदयद्रावक अशा अंत:कलहाला तोंड द्यावे लागले. मनाच्या प्रामाणिकपणाचा कौल स्वीकारताना कित्येक नाजूक हृदबंधांना तोडावे लागले. परंतु जीवनातील कोणत्या साध्याला अग्रक्रम द्यावयाचा हे एकदा ठरविल्यानंतर हे सारे अपरिहार्य आहे हे त्यांनी जाणले होते.

त्यांचे सारे आयुष्य ख्रिस्त भक्तीने व्यापलेहोते. त्यामधून निर्माण झालेल्या त्यांच्या मर्यादाही ध्यानी घ्याव्या लागतील. ख्रिस्तनिष्ठेमुळे त्यांना स्वदेशाच्या पारतंत्र्याचे आकलन झाले नाही. विज्ञाननिष्ठा, बुध्दिप्रामाण्यवाद यांचा कालानुरूप पुरस्कार करण्याऐवजी त्यांनी ख्रिस्ती धर्मस्वीकारात सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. म्हणूनच बाबांची विचारसरणी प्रामाणिक असली तरी एकांगी आहे असे वाटते.

बाबांना नीतीची ओढ बालपणापासून होती. ईश्वराविषयी श्रध्दाभाव हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अविभाज्य वैशिष्टय होते. त्यांची धर्मजिज्ञासा प्रबळ होती म्हणूनच स्वधर्मातील विसंगती त्यांच्या ध्यानी आल्या. त्यांची ख्रिस्तनिष्ठा उत्कट होती. शिस्तप्रियता, प्रत्येक कामातील काटेकोरपणा, टापटीप वाखाणण्यासारखी होती. ईश्वरावरील लेकरासारखा भाव, दांभिकपणाचा त्वेष,

जिद, सततोद्योगाची प्रवृत्ती, व्यापक भ्रातृभावना ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची आणखी कांही वैशिष्ट्ये आहेत.

या सर्वांचे अवलोकन केल्यानंतर बाबा पदमनजींचे व्यक्तिमत्व आणि त्याचा आविष्कार याविषयी असे म्हणावेसे वाटते की, स्वत: जागे होऊन दुसऱ्यांना जागे करणारे बाबा पदमनजी हे केवळ धार्मिक स्वरूपाचे प्रबोधन करण्याची खटपट करीत होते. त्यांची ही भूमिका नीट ध्यानी घेतल्यानंतरच त्यांच्या साहित्यनिर्मितीचे मूल्यमापन करणे इष्ट होईल.

-000-

## संदर्भ - सूचि


१. वाळिंबे, डॉ. रा.शं. - एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, प्रकाशक रा.शं. वाळिंबे, पुणे. आवृत्ति पहिली १९६२, पृष्ठ २९ ते ३२.

२. तत्रैव, पृष्ठ २६

३. शिखरे, दा.न. -'धार्मिक संस्था व संप्रदाय (आधुनिक काळ)', महाराष्ट्र जीवन, संपा. गं.बा.सरदार, जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे आवृत्ति पहिली १९६०, पृष्ठ १६४.

४. तत्रैव, पृष्ठ १६१, १६२

५. क-हाडकर, डॉ. के.सी.- बाबा पदमनजी : काल व कर्तृत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई आवृत्ती पहिली १९७९, पृष्ठ २

६. बाबा पदमनजी - अरूणोदय बॉम्बे ट्रॅक्ट अॅण्ड बुक सोसायटी, मुंबई. द्वितियावृत्तीचे पुनर्मुद्रण ऑगस्ट १९५५, पृष्ठ २५

७( तत्रैव, पृष्ठ ८०

८. तत्रैव, पृष्ठ ८४

९. तत्रैव, पृष्ठ ८६

१०. ज्ञानोदय, ३० जुन १८९२, पृष्ठ २०५, २०६.

११. अरूणोदय, पृष्ठ ८९

१२. ज्ञानोदय, ५ जानेवारी, १८५३, पृष्ठ १४

१३. ज्ञानोदय, २ मे, १८५३, पृष्ठ १४

१४. तत्रैव

१५. अरुणोदय, पृ.१२१

१६. ती पांच पुस्तके अशी - १) निबंधमाला २) हिंदू लोकांच्या सणांविषयी निबंध ३) व्यभिचार निषेधक बोध ४) स्त्रीविद्याभ्यास निबंध ५) कुटुंबाची सुधारणा

१७. अरुणोदय, पृष्ठ २०९, २१०

१८. बाबा पदमनजी - अनुभवसंग्रह, भाग पहिला व दुसरा व्हिक्टोरिया प्रिंटिंग प्रेस, मुंबई १८९९. ( पृष्ठ १ ते ३० यामधून घेतलेला सारांश )

१९. तत्रैव, पृष्ठ २५३, २५४

२०. तत्रैव, प्रस्तावना, पृष्ठ ६

२१. ढाळवाणि, दा.का. - आमच्या ख्रिस्ती कादंबऱ्या, चरित्रे, गोष्टी, नाटके, ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपा. भा.कृ.उजगरे महाराष्ट्रीय ख्रिस्ती साहित्यसेवा मंडळ, सासवड, जि.पणे आवृत्ती पहिली डिसेंबर १९३१, पृष्ठ ९९

२२. ज्ञानोदय, १६ मार्च, १९०५, पृष्ठ ८३

२३. ज्ञानोदय ६ सप्टेंबर, १९०६, पृष्ठ २८४ व २८६

२४. जोशी, लक्ष्मणशास्त्री - 'महाराष्ट्रातील धर्मसुधारणेचे आंदोलन,'
अस्मिता महाराष्ट्राची, संपाद. भीमराव कुलकर्णी
प्रकाशक - कार्यकारी अध्यक्ष, मराठा मंदिर
आवृत्ती पहिली नोव्हेंबर १९७१, पृष्ठ ५३३ ते ५३५

२५. अरूणोदय, पुरवणी, पृष्ठ २३६

--ooo--